Vol 5 Issue 10 Nov 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 10 | Nov - 2015


# महाराष्ट्रातील औद्योगिक विकास एक अभ्यास

सी.एन.चोबे
संशोधक, जालना.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्रानंतर उद्योग क्षेत्राचा क्रमांक येतो. २००६–१० मध्ये चालू किमतीनुसार उद्योगांचा २८.६ टक्के इतका वाटा निव्वळ राज्य उत्पन्नात होता, तर सेवा क्षेत्र व कृषि क्षेत्राचा अनुक्रमे ६०.६ टक्के व १०.५ टक्के इतका हिस्सा होता यावरून लक्षात येते की, उद्योगाचे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे.

औद्योगिक विकास म्हणजे आर्थिक विकास असे समीरकण असल्याचे मानले जाते. औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारनी विविध औद्योगिक धोरणांचा स्विकार करून त्या द्वारे औद्योगिकीकरणास गती देण्याचे प्रयत्न केलेले आहेत. महाराष्ट्राने औद्योगिकीकरणास विविध पुरक संस्थांची निर्मिती, सामुहीक प्रोत्साहन योजना, पोषक औद्योगिक धोरण इ. द्वारे जाणिवपूर्वक प्रयत्न करून औद्योगिक क्षेत्रात पहिल्या क्रमांकाचे राज्य असे स्थान देशात निर्माण केलेले आहे.



वार्षिक उद्योग पाहणीच्या निष्कर्षावरून वर्ष 2012–13 मध्ये ारतातील एकूण नोंदणीकृत उद्योगांमध्ये महाराष्ट्राचा वाटा 13.03 टक्के, स्थिर ंडवलातील वाटा 15. 82 टक्के तर निव्वळ मुल्यवृध्दीतील वाटा 20.98 टक्के इतका होता. या औद्योगिक विकासाच्या विविध निर्देशकांनुसार महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकासात देशात अग्रेसर असल्याचे स्पष्ट होते.

प्रमुख राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीबाबत दिसून येते की, ऑगस्ट १९९१ ते ऑगस्ट २०१० या कालखंडात देशातील एकूण प्रस्तावित गुंतवणूक व रोजगार यामध्ये महाराष्ट्र राज्य अनुक्रमे १० टक्के व १५ टक्के इतका वाटा घेऊन अग्रस्थानी होते. तसेच या कालखंडात महाराष्ट्राने ८४ हजार कोटी इतकी विदेशी थेट गुंतवणूक प्राप्त करून देशामध्ये प्रथम स्थान पटकावले आहे.

वर्तमान अभ्यासात महाराष्ट्राचा १९६०–६१ ते 2012–13 या काळात औद्योगिक विकासाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्याद्वारे औद्योगिक प्रगतीचा कल व राज्यांतर्गत औद्योगिक विषमता शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच महाराष्ट्राचे औद्योगिक विकासाबाबत ारत व इतर राज्यांच्या तुलनेने असलेले स्थान निश्चियन करण्यात आले आहे.

### औद्योगिक विकास अर्थ व महत्व

(Meaning and Significance of Industrial Development)

एखाद्या प्रदेशाच्या आर्थिक विकासास गती देण्याची प्रक्रिया म्हणून औद्योगिक विकास आणि औद्योगिकीकरण या दोन शब्दांना समान अर्थाने विचारात घेतले जाते. आज औद्योगिक विकास हा आर्थिक विकास या शब्दासमान झालेला असल्याने औद्योगिकीकरणाचे महत्व आपल्या लक्षात येऊ शकते.

लोकांच्या राहणीमानाचा स्तर उंचावण्यासाठी उच्च वृध्दी दर प्राप्त करण्याचे साधन म्हणजे जलद औद्योगिकीकरण होय.

(Rapid Industrialization is a means to achieve higher rate of growth in order to raise the standard of living of people.)

औद्योगिकीकरण ही ारतातील आर्थिक प्रगतीची अपरिहार्य अट आहे.

(Industrialization \ssine-qua-non of economic progress in India.)

औद्योगिकीकरणास संपूर्ण आर्थिक विकासाचे मूल ूत साधन अशी मान्यता देण्यात आलेली आहे.

(Industrialization has been recognized as a basic tool for overall economic development)

अविकसीत देशांच्या आर्थिक विकासात औद्योगिकीकरण श्रेष्ठ ूमिका करत आहे.

(Industrialization has a major role to play in the economic development of the under developed

countries)

औद्योगिकीकरण बेरोजगारी दूर करणे, उत्पन्न स्तरात वाढ करणे, संसाधनांचा पर्याप्त उपयोग करणे, अंतर्गत व बहिर्गत व्यापारात वाढ करणे, आणखी औद्योगिकीकरणाकरिता पाया ूत सुविधांचा विकास करणे यामध्ये उपयोगी असते. प्रत्येक देश उच्चतम रोजगाराचे ध्येय गाठणे व सुखी जीवनाकरीता संधी पुरविण्याच्या हेतुने औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेची गती वाढविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.

(Industrialization can be helpful in removing unemployment, increasing income levels, optimizing resources, promoting internal and external trades and developing infrastructure for further industrialization. Every country makes conscious efforts to accelerate the process of industrialization with a view to achieve the goal of maximum employment and provide opportunities for comfortable living.)

औद्योगिकीकरणाचे फायदे फक्त लोकांच्या जीवनात आर्थिक क्षेत्रापुरतेच मर्यादीत न राहता संपूर्ण सामाजिक पध्दतीला उच्च स्तराकडे नेण्यासाठी होतात. यामध्ये आधुनिक ज्ञान प्राप्त करण्यासाठी संधी मध्ये वाढ, उत्तम प्रकारची घरे, आरोग्य व जीवनासाठीच्या इतर आधुनिक सुविधांची उपलब्धता यांचा समावेश होतो.

थोडक्यात  ारतासारख्या विकसनशील देशाला आर्थिक  र राट व विकास साधण्यासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे. औद्योगिकीकरणाचे महत्व लक्षात घेता महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिकीकरणाच्या प्रगतीचा अभ्यास राज्याच्या स्थापनेपासून ते 2012–13 या कालखंडासाठी करण्याचा येथे प्रयत्न करण्यात आलेला आहे.

### *महाराष्ट्रातील औद्योगिक विकास (१९६०–६१) ते 2012–13.*

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर औद्योगिकीकरणासाठी जाणीवपूर्वक व नियोजनबध्द प्रयत्न करण्यात आलेले आहेत. या प्रयत्नांमध्ये उद्योगासाठी विविध पुरक संस्था, जसे की महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिकॉम, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, एम.सी.ई.डी., इत्यादी आणि विविध सामुहीक प्रोत्साहन योजना यांचा अवलंब इ. चा समावेश होतो. देशात औद्योगिकीरणास सर्वसाधारणपणे योग्य गती मिळाल्यास राज्यातही औद्योगिक विकास वाढण्यास मदत होते. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेंव्हा पश्चिम महाराष्ट्र, विद ॅ व मराठवाडा या प्रदेशांमध्ये प्रचंड औद्योगिक विषमता होती म्हणून राज्य सरकारने औद्योगिक फैलाव व विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा स्विकार केला. राज्याच्या निर्मितीनंतर राज्याने औद्योगिक क्षेत्रात दैदिप्यमान प्रगती साधलेली आहे. अर्थात यासाठी जसे राज्याचे औद्योगिक धोरण सहाय्यक ठरलेले आहे, तसेच देशाच्या औद्योगिक धोरणाची ुमीका ही महत्वाची ठरलेली आहे.

वर्तमान अभ्यासात महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाचा आढावा निवडक 4 निर्देशकांच्या सहाय्याने घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

कामगार संख्या, चालु व नोंदणीकृत कारखाने, स्थिर  ांडवल, मुल्य वृध्दी व औद्योगिक वीज वापर या निवडक निर्देशकांची अभ्यासासाठी निवड करण्यात आलेली आहे.

*तक्ता –१  महाराष्ट्रातील औद्योगिक विकास दर्शविणारे निवडक निर्देशक*
*(१९६०–६१ ते २०१२–13)*

| निर्देशक | 1960–61 | 1993–94 | 2003–04 | 2012–13 |
|---|---|---|---|---|
| कामगार संख्या | 369623 | 983455 (166) | 1051901(185) | 123334(334) |
| चालु व नोंदणीकृत कारखाने (संख्या) | 1228 | 26663 (2071) | 29637(2313) | 28949 (2357) |
| स्थिर भांडवल (रू. कोटीमध्ये ) | 95 | 68586 (67885) | 83472 (87765) | 344930(362512) |
| मुल्य वृध्दी (रू. कोटीमध्ये) | 112 | 34762 (30937) | 41910 (37320) | 178872(159760) |
| औद्योगिक वीज वापर (दश लक्ष कि.वॅ.तास) | 2140 | 14356 (571) | 20903 (877) | 32890 (15369) |

अंदाजित

सूचना  कंसातील अंक शेकडा वृध्दीदर दाखवितात.

### *स्त्रोत*

१) महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय गोषवारा १९६०–६१.

२) जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन १९९३–९४ व 2012–13 चे विविध अंक व अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय अ लेख,

३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2012–13

तक्ता १ मध्ये 1960–61 या कालखंडात विविध चार समयास महाराष्ट्रातील औद्योगिक विकासावर वेगवेगळ्या पाच निवडक निर्देशकांच्या सहाय्याने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तक्त्यातील संख्यात्मक सामग्रीच्या विश्लेषणावरून स्पष्ट होते की,

१९६०–६१ ते 2012–13 या कालखंडात स्थिर ंडवल, मुल्य वृध्दी व औद्योगिक वीज वापर हे निर्देशक वृध्दी दर्शवितात, तर कामगार संख्या व कारखाना संख्या हे दोन निर्देशक सुरुवातीच्या काळात वृध्दी दाखवितात, परंतु शेवटच्या समयास घट दाखवितात.

१९६०–६१ ते 2012–13 पर्यंत कामगार संख्येत 334 टक्के एवढी वाढ झाली तसेच चालु व नोंदणीकृत कारखान्यांची संख्या 2012–13 पर्यंत 2357 टक्के जास्त वाढली,

स्थिर ंडवलाबाबत असे दिसते की, यात जवळपास 362512 टक्के या कालखंडात वाढ झालेली आहे, तर मूल्य वृध्दी मध्ये 159760 टक्के जास्त वाढ झाल्याचे दिसून येते.

थोडक्यात सर्वच निर्देशकांमध्ये सातत्याने या कालखंडात वृध्दी झालेली आहे. १९९१ मध्ये देशात जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरणासंबंधीचे धोरण स्विकारल्यानंतरही महाराष्ट्रात औद्योगिक विकासात वृध्दी झाल्याचे आकडेवारीवरून लक्षात येते.

## *महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची रताशी तुलना*

रताच्या एकूण औद्योगिक विकासात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. वार्षिक उद्योग पाहाणीच्या निष्कर्षावरून वर्ष 2012–13 मध्ये देशातील एकूण नोंदणीकृत उद्योगांमध्ये महाराष्ट्राचा हिस्सा 13.03 टक्के, स्थिर ंडवलात 15.82 टक्के, निव्वळ मुल्यात 20.98 टक्के, तर रोजगार संख्येत 12.27 टक्के इतका हिस्सा होता.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची रताशी तुलना करण्यासाठी काही महत्वाच्या निर्देशकांचा विचार तक्ता २ मध्ये करण्यात आलेला आहे.

### *तक्ता –२ महाराष्ट्र व रत यांच्या औद्योगिक विकासाचे महत्वाचे निर्देशक (रु. लाखात)*

| निर्देशक | 2011–12 | | 2012–13 | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| अ प्रति कारखाना निर्देशक : | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | 1014 | 851 | 834 | 760 |
| उत्पादित वस्तु व सेवा यांचे मुल्य | 3207 | 2343 | 2875 | 2213 |
| निव्वळ मुल्य वृध्दी | 605 | 366 | 546 | 337 |
| रोजगार संख्या | 55 | 58 | 43 | 47 |
| ब प्रति कामगार निर्देशक : | | | | |
| कामगार उत्पादकता वेतनातील प्रति रूपया निव्वळ मूल्य वृध्दी | 10.7 | 8.4 | 10.8 | 8.32 |
| निव्वळ मूल्य वृध्दी | 11.1 | 6.4 | 12.7 | 7.2 |
| वर्षिक मजुरी | 1.03 | 0.75 | 1.17 | 0.86 |

अंदाजित
स्त्रोत महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2011–12, 2012–13

तक्ता २ वरून स्पष्ट होते की, 2011–12 आणि 2012–13 या दोन्ही वर्षात महाराष्ट्र रोजगार सोडून सर्वच निर्देशकांबाबत रताच्या तुलनेने पुढे होता. या आकडेवारीवरून दिसून येते की, 2012–13 मध्ये महाराष्ट्रातील प्रति कारखाना स्थिर ंडवलातील गुंतवणूक, उत्पादित वस्तु व सेवांचे मूल्य निव्वळ मूल्य वृध्दी रतापेक्षा अनुक्रमे 9.13 टक्के ते 29.91 टक्के व 8.51 टक्के कमी होती, तर रोजगार १२ टक्याने कमी होता.

2012–13 मध्ये महाराष्ट्राची प्रति कामगार उत्पादकता, निव्वळ मूल्य वृध्दी व वार्षिक मजुरी रताच्या तुलनेने अनुक्रमे 29.80 टक्के, 76.30 टक्के व 36 टक्के इतकी अधिक होती.

वरील विश्लेषणावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्र औद्योगिक विकासाबाबत रताच्या तुलनेने पुढे आहे.

## *महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची निवडक प्रमुख राज्यांशी तुलना*

(Industrial Development of Maharashtra vis-à-vis Select Leading States)

औद्योगिक विकासाबाबत महाराष्ट्र राज्य रतातील इतर राज्यांशी तुलना करता २० व्या शतकाच्या मध्यापासुन अग्रगण्या स्थान ुषवत आहे. महाराष्ट्राचे हे स्थान कायम असल्याचे 2012–13 या वर्षासाठीच्या प्रमुख राज्यांच्या औद्योगिक विकासाच्या निवडक निर्देशकांबाबतच्या संख्यात्मक सामग्रीच्या विश्लेषणावरून तक्ता ३ वरून लक्षात येते.

### तक्ता –३ महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची निवडक प्रमुख राज्यांशी तुलना दर्शविणारे महत्वाचे निवडक निर्देशक (२०१३–13)

| राज्य | कारखाने संख्या | रोजगार संख्या हजारात | गुंतविलेले भांडवल रु कोटीत | सकल उत्पादन रु कोटीत | निव्वळ मूल्य वृध्दी रु. कोटीत |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | 28949 (13.03) | 1333341 (12.27) | 34492959 (15.82) | | 17872932 (20.98) |
| गुजरात | 22587 (10.17) | 1046462 (10.41) | 32612528 (14.96) | | 11887604 (13.95) |
| तामिळनाडू | 36869 (16.60) | 160247 (1.59) | 18724233 (8.59) | | 9136446 (10.72) |
| कर्नाटक | 11753 (5.29) | 665597 (6.62) | 14515109 (6.66) | | 5347936 (6.28) |
| आंध्र प्रदेश | 15358 (6.91) | 406048 (4.04) | 13081848 (6.00) | | 2382242 (2.80) |
| उत्तर प्रदेश | 14440 (6.50) | 635759 (6.33) | 10271141 (4.71) | | 4111251 (4.83) |
| झारखंड | 2997 (1.21) | 127287 (1.27) | 6728469 (3.09) | | 2091303 (2.45) |
| हरियाणा | 6163 (2.77) | 431425 (4.29) | 7839623 (3.60) | | 3883175 (4.56) |
| छत्तीसगड | 2441 (1.10) | 137950 (1.37) | 6030773 (2.77) | | 1521724 (1.79) |
| मध्यप्रदेश | 4206 (1.89) | 223790 (2.23) | 13657975 (6.26) | | 2146115 (2.52) |
| प. बंगाल | 8607 (3.87) | 537284 (5.35) | 8206693 (3.76) | | 2228051 (2.62) |
| पंजाब | 12427 (5.59) | 468127 (4.66) | 3906929 (1.79) | | 1984470 (2.33) |
| एकूण इतर राज्यांसह | 222120 (100.00) | 10051626 (100.00 ) | 218026022 (100.00) | | 85194869 (100.00) |

सूचना कंसातील आकडे एकुण राशीशी टक्केवारी दर्शवितात.

स्त्रोत : Statistical Outline of India 2012.13, Tata Services Ltd., Department of Economics & Statistics, Bombay House. Mumbai.

तक्ता ३ मध्ये ११ प्रमुख राज्यांच्या औद्योगिक विकासाबाबत कारखान्यांची संख्या, रोजगार, गुंतवलेले ांडवल, सकल उत्पादन व निव्वळ मूल्य वृध्दी या निवडक निर्देशकांबाबतच्या संख्यात्मक सामग्रीच्या विश्लेषणावरून लक्षात येते की, सर्वसाधारणपणे आजही महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकासात सर्व राज्यांमध्ये अग्रस्थानी आहे.

कारखान्यांची संख्या तामिळनाडू हे राज्य ारताच्या एकूण राशींपैकी अनुक्रमे 16.60 टक्के इतका हिस्सा धारण करून अग्रस्थानी आहे, तर महाराष्ट्र १२.५ व रोजगार 12.27 टक्के इतका वाटा प्राप्त करून दुसऱ्या क्रमांकावर आहे.

महाराष्ट्राने गुंतविलेले ांडवल, निव्वळ मुल्य वृध्दी बाबत ारताच्या एकुण राशींमध्ये अनुक्रमे 15.82, 20.98 टक्के इतका हिस्सा घेऊन अग्रगण्य स्थान टिकवून ठेवलेले आहे, तर गुजरात याबाबत अनुक्रमे 14.96, 13.98 टक्के इतका वाटा धारण करून दुसऱ्या स्थानावर असल्याचे दिसते.

वरील विश्लेषणावरून दिसून येते की, निवडक राज्यांमध्ये प. बंगाल व पंजाब ही राज्ये औद्योगिक विकासात शेवटच्या क्रमांकावर येतात.

निव्वळ मुल्य वृध्दी या महत्वाच्या निर्देशकावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्र औद्योगिक विकासात देशात अग्रस्थान आजही कायम ठेवून आहे. परंतु हे स्थान गुजरात राज्य विष्यात खेचून घेण्याची शक्यता त्याच्या विविध निर्देशकांमधील हिश्याने ध्वनीत करत आहे.

### औद्योगिक विषमता

महाराष्ट्र हे देशात सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. परंतु हे औद्योगिकीकरण राज्याच्या विशिष्ट ठिकाणी केंद्रीत झालेले आहे. मुंबई, ठाणे, बेलापूर, पुणे अशा विशिष्ट शहरांमधून औद्योगिक वसाहती विकसित झालेल्या आहेत. राज्यातील जिल्हे व प्रशासकीय वि ागांमध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिक विषमता आहे. त्यामुळे औद्योगिक विकासाची फळे राज्यातील सर्व लोकांना चाखावयास मिळत नाहीत. देशातील वि िन्न लोक व वि ाग यांच्यामध्ये आर्थिक विकासाच्या फळांचे असमान वाटप व त्यामुळे आर्थिक विकासात विषमता

व असमानता निर्माण होणे म्हणजे प्रादेशिक विषमता होय.

वर उल्लेखलेली प्रादेशिक विषमतेची स्थिती महाराष्ट्रात औद्योगिकीकरणाबाबत विभिन्न प्रशासकीय विभाग व जिल्ह्यांमध्ये असल्याचे चित्र दिसते.

राज्यातील औद्योगिक विषमतेची तीव्रता कमी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने वेगवेगळे प्रयत्न आजपर्यंत केल्याचे दिसते. मागास भागात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरु होण्यासाठी व तिला गती देण्यासाठी राज्यातील अशा भागात वृध्दी केंद्राची स्थापना करणे, उद्योग सुरु करण्यासाठी विविध प्रेरके देणे, इ. योजना राबवून औद्योगिकीकरणाचा फैलाव व प्रसार संपुर्ण राज्य र होण्यासाठीचे प्रयत्न महाराष्ट्र सरकार करत आहे. १९६४ पासुन मुंबई शहरात औद्योगिक संस्थांसाठी निर्बंधक स्थान निश्चयन धोरण राबविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सरकारने उद्योगधंद्याच्या विकेंद्रीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांमधून मागास भागात काही नवीन उद्योग केंद्रे उदयास आलेली आहेत. यात नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अकोला इ. शहरांचा समावेश होतो असे असले तरी हा बदल मर्यादित स्थानांपुरताच मर्यादित असल्याने आजही विविध जिल्हे व प्रशासकीय विभाग यांच्यात औद्योगिक विषमता मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसते.

अभ्यासाच्या सोयीसाठी तक्ता ४ मध्ये महाराष्ट्रातील विविध सहा प्रशासकीय विभाग–निहाय औद्योगिक विकास काही निवडक निर्देशकांच्या साहाय्याने 2008–09 सालासाठी दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच या तक्त्यातील अशा निर्देशकांच्या आकडेवारीवरून आंतर–प्रादेशिक (आंतर–विभागीय) औद्योगिक विषमता मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते. या निवडक निर्देशकांमध्ये कामगार संख्या, चालु व नोंदणीकृत कारखान्यांची संख्या, स्थिर भांडवल, मुल्य वृध्दी व औद्योगिक वीज वापर यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

### तक्ता –४ महाराष्ट्रातील विभागनिहाय औद्योगिक विकासाची विविध निर्देशके (वर्ष 2008–09)

| विभाग | नोंदणीकृत चालु निर्माणी | | निर्माणी कामगारांची संख्या | | स्थिर पुंजी (रू. कोटी मध्ये) | | मुल्य वृध्दी (रू. कोटी मध्ये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1999–2000 | 2008–09 | 1999–2000 | 2008–09 | 1999–2000 | 2008–09 | 1999–2000 | 2008–09 |
| कोकण | 3587 (18.87) | 2930 (45.12) | 155790 (25.90) | 398645 (38.55) | 40840.18 (58.00) | 89100.57 (49.77) | 5511.54 (49.49) | 70943.85 (63.12) |
| नशिक | 5652 (29.73) | 4220 (20.63) | 111187 (18.54) | 122658 (11.86) | 4206.11 (5.97) | 15604.38 (8.72) | 2609.38 (23.43) | 10479.72 (9.32) |
| पुणे | 3479 (18.30) | 2841 (13.89) | 179967 (30.00) | 319520 (39.90) | 14428.83 (20.49) | 44952.51 (25.11) | 266.30 (2.39) | 10479.72 (25.90) |
| औरंगाबाद | 2003 (10.54) | 1401 (6.85) | 66946 (11.16) | 80483 (7.78) | 34433.11 (4.88) | 13377.81 (7.47) | 1325.27 (11.90) | 6601.39 (5.87) |
| अमरावती | 1119 (5.36) | 1061 (5.19) | 17915 (2.99) | 24773 (2.40) | 1007.45 (1.43) | 1722.78 (0.96) | 21.21 (0.19) | 606.27 (0.54) |
| नागपूर | 3269 (17.00) | 1705 (8.33) | 68009 (11.34) | 88133 (8.52) | 6496.65 (9.23) | 14259.82 (7.97) | 1403.19 (12.60) | 4205.91 (3.74) |
| एकूण | 19009 (100.00) | 20458 (100.00) | 599814 (100.00) | 1034212 (100.00) | 70412.32 (100.00) | 179017 (100.00) | 11136.88 (100.00) | 112390.50 (100.00) |
| माध्य | 1110.68 | 905.31 | 40147.62 | 47707.97 | 11735.39 | 29836.31 | 1856.15 | 18731.75 |
| विचार गुणक | 123.55 | 191.46 | 125.05 | 186.90 | 127.68 | 108.58 | 108.58 | 140.87 |

सूचना कंसातील आकडे एकूण राशीशी टक्केवारी दर्शवितात.

स्त्रोत जिल्हा सामाजिक–आर्थिक समालोचन 1999–2000, 2008–09 (MOSPI Data) चे विविध अंक व अर्थ सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय अभिलेख.

तक्ता ४ मधील विश्लेषणावरून सुचित होते की, विविध सहा विभागांपैकी कोकण विभागाचा औद्योगिक विकासाच्या विविध निर्देशकांपैकी कामगार संख्या, औद्योगिक वीज वापर व कारखान्यांची संख्या यामध्ये जवळपास ५० हिस्सा असल्याचे दिसते, तर स्थिर भांडवल व मुल्य वृध्दीमध्ये अनुक्रमे ६८ व ७२ टक्के इतका हिस्सा आहे. या सर्वच निर्देशकांबाबत अमरावती विभागाचा वाटा सर्वात कमी असल्याचे दिसते. कोकण विभागानंतर पुणे विभागाचा हिस्सेवारीमध्ये दुसरा क्रमांक, नाशिकचा तिसरा क्रमांक, नागपूरचा चौथा क्रमांक, तर औरंगाबादचा पाचवा क्रमांक लागतो. माध्याचा विचार करता दिसून येते की, केवळ कोकण विभाग पाचही निर्देशकांबाबत सरासरीच्या वर येतो, तर पुणे विभाग केवळ कामगार संख्या, कारखाना संख्या व औद्योगिक वीज वापर यामध्ये सरासरीच्या वर आहे. इतर विभाग सर्व निर्देशकांसाठी सरासरीच्या खाली असल्याचे दिसते.

प्रत्येक निर्देशकांसाठी विभाग–निहाय हिस्सा दर्शविणारी टक्केवारी व विचरण गुणक यावरून दिसून येते की, महाराष्ट्रात विविध सहा प्रशासकीय विभागांत मोठ्या प्रमाणावर औद्योगिक विकासाबाबत असमतोल आहे. तसेच विविध अभ्यासातून स्पष्ट झालेले आहे की, महाराष्ट्रात आंतर–जिल्हा औद्योगिक विषमता मोठ्या प्रमाणावर आहे, जसे की, कोकण विभागात मुंबई व ठाणे जिल्हे वगळता बाकीचे जिल्हे,

पुणे वि गात पुणे जिल्हा सोडून इतर जिल्हे, नागपूर वि गात नागपूर शिवाय इतर जिल्हे, औरंगाबाद वि गात औरंगाबाद सोडून बाकीचे जिल्हे आणि अमरावती वि गात अकोला जिल्ह्याशिवाय इतर जिल्हे औद्योगिक विकासात मागे राहिलेले आहेत.

## उपसंहार

महाराष्ट्राचे ौगोलिकदृष्ट्या देशाच्या मध्य ागी असलेले ठिकाण, त्यामुळे परकीय आक्रमणापासुनची सुरक्षितता, देशाच्या सर्व प्रमुख शहरांशी रस्ते, लोहमार्ग व हवाईमार्गाने असलेली वाहतुक व्यवस्था व इतर पाया ूत सुविधा, औद्योगिकीकरणासाठी विविध पुरक संस्था, जसे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, एमसीईडी, एमईडीसी, इ. निर्मिती, मागास ागात औद्योगिकीकरणास चालना देण्यासाठी विविध सामुहिक प्रोत्साहन योजना, अनुकूल औद्योगिक धोरणे इ. मुळे औद्योगिक विकासात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकाचे स्थान निर्माण करू शकले. औद्योगिक विकासासाठी राज्य सरकारकडून जाणिवपूर्वक व नियोजनबध्द प्रयत्न करण्यात आलेले आहेत. देशाच्या औद्योगिक विकासाबाबतच्या पहिल्या क्रमांकाचा दावा दुर्लक्षित करता येत नाही म्हणून महाराष्ट्राला आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी वाढत्या प्रयत्नांची आवश्यकता आहे.

औद्योगिक विकासात महाराष्ट्राला आपले स्थान कायम ठेवण्यासाठी अधिक पाया ूत सुविधा, विशेषत पुरेसा वीज पुरवठा, पाणी पुरवठा, कर्ज पुरवठा, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दर्जात सुधारणा व कार्यक्रमाचा आणखी विस्तार, इ. ची आवश्यकता आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणाबरोबर औद्योगिक फैलाव व विकेंद्रीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करून राज्यांतर्गत आंतर–प्रादेशिक औद्योगिक विषमता दूर करण्याची सुध्दा आवश्यकता आहे. जागतिक आर्थिक मंदीच्या पार्श्व ूमीवर ४ नोव्हेंबर २०११ रोजी केंद्र सरकारने नवीन औद्योगिक धोरण जाहीर केलेले आहे. महाराष्ट्र राज्यालाही या धोरणाचा औद्योगिक विकासासाठी फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

## संद 

१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१०–११.

2.Reddy B. Bhagavan, Industrialization and Employment in India, an article in Southern Economist, Bangalore, March 1988, vol. 26, No. 21;

3.Ibid;

4. A.V.V.S.K. Rao & C.V.A.S. Suryanarayana, Industrial Development Pattern in Southern States, an article in Regional Economic Development in India, edited by Susheela Subrahmanya (1995), Deep and Deep Publications, New Delhi;

5. Ruddar Datt and K.P.M. Sundharam (2006), Indian Economy, S.Chand and Co. Ltd., New Delhi;

6.Dr. M.A. Lokhande (2000), Industrial Development of Jalna District (unpublished thesis in commerce), Dr.B.A.M.U. Aurangabad;

7.Vijay Kumar Sharma, Roshan Lai Vashist and Nishu Sharma, Industrialization and Development: A Macro Economic Analysis, an article in The Indian Journal of Economics, July 2008, vol LXXXXI, No. 352, part I;

८. महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय गोषवारा १९६०–६१

९. जिल्हा सामाजिक–आर्थिक समालोचन 1999–2000 व 2008–09 चे विविध अंक

10. Statistical Outline of India 2009-10, Tata Services Limited, Department of Economics and Statistics, Bombay House, Mumbai;

11. Industrial Statistics, March 2004, published by UDYOG MITRA, A Government of Maharashtra Organization;

12.Dr. D.P. Palsapure (2004), Industrial Development of Maharashtra State, Himalaya Publishing House, Mumbai.

13.Unit level Data Pruchased From MOSPI New Delhi

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org